# येमेन आणि इतर घडामोडी

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

येमेन देशातील युद्ध जूनमध्ये अधिक तीव्र झाले. त्याचा आढावा आधी घेऊ, नंतर काही आंतरराष्ट्रीय परिषदांचा.

**येमेन**

येमेन सौदी अरेबियाच्या दक्षिणेला येतो. तो पूर्वापार पंथीय वैराने उभा विभागलेला आहे. पश्चिमेला हूथी या शियापंथीयांचा प्रभाव तर पूर्वेला जास्त करून सुन्नी. त्यात अलिकडे अल-कईदाचा व इस्लामिक स्टेटचा तेथे प्रवेश झाला आहे व हिंसाचारात भर पडत आहे.

२०१५ पासून पंथीय वैराची तीव्रता वाढली. त्यावर्षी सौदी अरेबियाने सशस्त्र हस्तक्षेप सुरू केला. सौदी अरेबिया सुन्नी म्हणून तो शियापंथीय हूथींविरोधी. युनायटेड अरब एमिरेटसबरोबर सौदीने कारवाई सुरू केली. तिला अमेरिकेचा निरीक्षक अस्त्रांचा पाठिंबा आहे. 'शत्रू' कोठे आहे, कोठे चालला आहे हे कॅमेरा टिपतो व त्यानुसार त्वरित हल्ला करता येतो. हूथींना शिया इराणचा सशस्त्र पाठिंबा आहे. म्हणजे, यात एका बाजूला सौदी अरेबिया, एमिरेटस ही सुन्नी आघाडी आणि अमेरिका आहे, दुसऱ्या बाजूला येमेनी हूथी-इराण आहेत, तर आतंकवादी अल्-कईदा, इस्लामिक स्टेट हा या संघर्षाचा तिसरा अक्ष आहे, त्यांच्या ताब्यात देशाचा बराचसा पूर्व भाग आहे.

येमेनच्या पश्चिमेला लाल समुद्रावर अल्-हुदेदा नावाचे बंदर आहे. त्यातून येमेनला लागणाऱ्या आवश्यक व अत्यावश्यक वस्तूंची आयात होते. अर्थव्यवस्था दुबळी असल्याने येमेन जवळ-जवळ संपूर्णत: आयातीवर अवलंबून आहे. ते सगळ्यात गरीब अरब राष्ट्र आहे.

या बंदरातून अशा मालाबरोबर इराण हूथींसाठी शस्त्रास्त्रे पाठवतो असा सुन्नी आघाडीचा दावा आहे. ते हूथींनी दोन वर्षांपूर्वी ताब्यात घेतले. सौदीने हे बंदर ताब्यात घेण्यासाठी हवाई हल्ले वाढवले आहेत. बंदराच्या आजूबाजूचा प्रदेश लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंत ताब्यात घेतलाच आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही झाली. पहिल्या दिवशीच अर्ध्या तासात ६८ निरपराध नागरिक ठार मारले गेले. बंदर संयुक्त राष्ट्र संघाच्या देखरेखीखाली ठेवावे म्हणजे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा चालू राहील हा प्रस्ताव फेटाळण्यात आला.

या शहराची लोकसंख्या ६ लाख. एव्हाना काही लोक शहर सोडून गेले आहेत पण उरलेल्यातील सुमारे अडीच लाख लोक (बहुतेक सर्वहारा) नक्की मृत्यूच्या दारात आहेत - हल्ल्यात किंवा उपासमारीने, रोगराईने. त्यांना आधार द्यायला सरकार, स्वयंसेवी संघटना, कोणतीही संस्थाच अस्तित्वात नाही. एकविसाव्या शतकात ही प्रागैतिहासिक हत्या चालू रहाणे, त्याची दखलही या 'एकमेकांशी जोडलेल्या' जगात नसणे हा मुद्दा.

आता आंतरराष्ट्रीय परिषदांकडे वळू.

**SCO**

Shanghai Co-operation Organisation (SCO) या संघटनेची शिखर-परिषद जूनच्या सुरुवातीला चीनमध्ये झाली. मागील वर्षापर्यंत या संघटनेत चीन, रशिया व पूर्वीच्या सोविएत युनिअनमधील कझाकस्तान, उझबेकिस्तान, किर्गिझिस्तान, ताजिकिस्तान हे देश होते. २०१७ला भारत व पाकिस्तान यांना पूर्ण सभासद म्हणून संघटनेत घेण्यात आले.

या पूर्ण सभासदांखेरीज निरीक्षक सभासद, संवाद सभासद व अतिथी-सभासद अशीही वर्गवारी आहे. त्यात युरेशियातील (आशिया अधिक काही युरोप) बहुतेक देश येतात. आजमितीला SCO त जगाची निम्मी लोकसंख्या ,एक-चतुर्थांश उत्पन्न आणि युरेशियाचा ८० टक्के भूभाग येतो. यावरून या संघटनेच्या विस्तार व खोलीचा अंदाज यावा.

SCO स्थापन झाली ती अमेरिकन-युरोपिअन अर्थ-संस्थांच्या (IMF, World Bank) जगावरील प्रभावाला प्रत्युत्तर म्हणून. सभासद-देशांतील बँकिंग, व्यापार, तंत्रज्ञानाची देवघेव इत्यादी क्षेत्रात सहकार्य वाढावे, यासाठी. त्याबरोबरच लोकशाही संवर्धनाचा उल्लेख आहे. विशेष म्हणजे, चीन-रशिया या मोठ्या देशांपासून उर्वरित बहुसंख्य देश या ना त्या स्वरूपाच्या हुकूमशाही आहेत!

अंतस्थ राज/अर्थकारण पहाता जाहीर उद्दिष्टे काहीही असली तरी यामागे चीनचा व्यापारी हेतू आहे. जगातील आजवरचा सगळ्यात महत्त्वाकांक्षी प्रयोग म्हणता येईल असा चीनचा One Belt One Road (OBOR) (किंवा Belt and Road Initiative - BRI) असा प्रकल्प आहे. त्याअंतर्गत चीनचे व्यापारी जाळे जगात अतिप्रचंड प्रमाणात वाढेल - जगातील ६८ देश त्यात येतील, ६५ टक्के लोकसंख्येवर त्याचा परिणाम होईल आणि आजच्या आकडेवारीत जगाचे ४० टक्के उत्पन्न त्याखाली येईल. आजच चीनने महामार्ग, उत्पादन, रेल्वे, ऊर्जा वगैरे अनेक

क्षेत्रात जवळजवळ संपूर्ण आफ्रिका खंड ताब्यात घेतले आहे. त्याबरोबर वर म्हटलेले पूर्व सोविएत युनिअनमधील देश.त्याद्वारे चीन युरोपपर्यंत धडकेल. या योजनेला मान्यता हा SCO चा खरा उद्देश. पण भारताने एकट्याने त्या संमतीपत्रावर सही केली नाही.

(OBORच्या अंतर्गत म्यानमार, पाकिस्तान येथेही चीनसक्रिय आहे. ते भारताला हितावह नाही.)

**G7**

ही विकसित देशांची संघटना. यात फ्रांस, जर्मनी, इटली, ब्रिटन, अमेरिका, जपान आणि कॅनडा येतात. यात आधी रशिया होता पण युक्रेनमधील क्रायमिया प्रदेश त्याने बळकावल्यानंतर त्याला वगळण्यात आले. G-7 चे हे वार्षिक संमेलन जागतिक प्रश्नांवर विकसित देशांचे धोरण आखण्यासाठी असते. त्यात या देशांची शक्यतो एकवाक्यता असावी, आपापसातील व उर्वरित जगाबरोबरचा व्यापार काही समान तत्त्वांवर व्हावा, इत्यादी उद्देश असतात. यावेळची परिषद कॅनडात झाली.

मात्र ती परिषद दोन-तीन निराळ्याच गोष्टींनी गाजली. यावेळी अमेरिकेच्या ट्रम्पने रशियाला परत या संघटनेत घ्यावे असा आग्रह केला, त्याला इतर राष्ट्रांनी विरोध केला. मग हे सगळे देश एकतर्फी व्यापारात अमेरिकेला लुबाडत आहेत हा त्यांच्या निवडणुकीतला धोशा लावला, कॅनडाच्या पंतप्रधानावर गद्दार माणूस असा वैयक्तिक आरोप केला. ट्रम्प ही परिषद अर्ध्यावर सोडून निघून गेले. दुष्परिणाम म्हणजे, अमेरिका व युरोप यांच्यातील दुही चीन व रशियाला फायदेशीर आहे. त्यांच्या विस्तारवादाला संयुक्त विरोध होत असे कारण युरोप-अमेरिका ही एक आघाडी त्याविरुद्ध आजवर असे. जागतिक स्थैर्यालाही लोकशाही देशांतील दुही हितावह नाही, भले ती भांडवलशाही असो.

आणखी एक परिणाम म्हणजे अमेरिकन धोरणाने युरोप अंतर्गत मतभेद सुरू झाले आहेत. अमेरिकेने युरोपबरोबरच्या व्यापारावर नवीन निर्बंध आणले आहेत. या निर्बंधांचा देशवार परिणाम निराळा असतो. उदा. जर्मन मोटारींवर अमेरिकेने आयातकर वाढवला याचा परिणाम जर्मनीवर जेवढा होतो, तेवढा फ्रांस किंवा ब्रिटनवर होत नाही. त्यामुळे G7 मध्ये राष्ट्रवादी प्रवाह जोर धरत आहेत. हे रशियाला हवे आहे कारण एकूण युरोप दुबळा करणे हा पुतीनचा हेतू आहे.

**तिसरी शिखर परिषद**

ट्रम्प व उत्तर कोरियाचा अध्यक्ष यांच्यात जूनमध्ये शिखर परिषद झाली. उत्तर कोरिया जागतिक प्रवाहात नाही. तो अण्वस्त्रक्षम आहे. तेथे राष्ट्राच्या स्थापनेपासून घराणेशाही आहे. सध्याची तिसरी पिढी. अंतर्गतविरोध राजवटीला मान्य नाही. विरोधकांना तुरुंगवास, मृत्युदंड होतो. म्हणजे, मानवी हक्कांची सर्रास पायमल्ली होते. त्याचा शेजारी देश दक्षिण कोरियात (जरी अतोनात भ्रष्टाचार असला तरी) लोकशाही आहे. तो देश विकसित आहे. उ. कोरिया त्याच्या अस्तित्वालाच कायमचा धोका आहे. उ. कोरिया आजवर तगून आहे तो चीनच्या आर्थिक पाठिंब्यावर. देशात राजधानीचा परिसर सोडता गरीबी आहे आणि हुकूमशाहीमुळे तिला वाचा फुटत नाही. जगाला आपली दखल देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपली अण्वस्त्रक्षमता सिद्ध करणे - या समजावर उ.कोरिया सतत क्षेपणास्त्रांच्या चाचण्या करत असतो. द.कोरियाच काय, अमेरिकेवर हल्ला करण्याची क्षमता आपल्याकडे असल्याच्या त्याच्या वल्गना असतात.

उ. कोरियाने अण्वस्त्रे बनवणे बंद करावे म्हणून द.कोरिया, अमेरिका १९९२पासून प्रयत्न करत आहेत. प्रत्येक वेळी 'तसे करतो' असे आश्वासन द्यायचे आणि तो कार्यक्रम चालूच ठेवायचा ही उ. कोरियाची परंपरा आहे. त्यामुळे त्या देशावर अनेक आंतरराष्ट्रीय निर्बंध आहेत. हे निर्बंध सैल व्हावेत म्हणून कोरिया चर्चेला आला.

या पार्श्वभूमीवर, आधीच्या अध्यक्षांना जे जमले नाही, ते मी करून दाखवतो या अहंकाराने ट्रम्पने उ. कोरियाच्या अध्यक्षाची भेट घेतली. या चर्चेतून निष्पन्न खरे तर काहीच झाले नाही. या आधीच्या करारांमध्ये अण्वस्त्रक्षमता खरोखर नष्ट केली जात आहे याची आंतरराष्ट्रीय नियमित तपासणी वेळोवेळी होणे, या निरीक्षकांना त्या कारखान्यांना भेट द्यायला मुभा असणे इत्यादी अटी अनुस्यूत होत्या. या भेटीतून निघाले ते एक दीडपानी संयुक्त पत्र. त्यात असा काहीही ठोस उल्लेख नाही. उ.कोरिया अण्वस्त्रक्षमता नष्ट करण्याच्या दिशेने प्रयत्न करेल अशी संदिग्ध भाषा आहे. ती इच्छा होते, योजना नाही. कारण ते केव्हा, कसे, आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली होणार का, हे काहीच तपशील नाहीत. उ.कोरियाने मात्र आपल्याला हवे ते पदरात पाडून घेतले-ते पाहू.

द. कोरिया, जपानच्या आरमाराबरोबर अमेरिका सराव करत असे. ते उ.कोरियावर वचक म्हणून. ते मात्र ट्रम्पने ताबडतोब थांबवले आणि त्याची पूर्वसूचनाही त्या देशांना दिली नाही. हे सराव थांबवणे ही उ. कोरियाची अट होती. म्हणजे, परिस्थिती जैसे थे च राहिली. फक्त जपान, द. कोरिया ही मित्र-राष्ट्रे दुखावली गेली. त्याबरोबरच व्यापारी निर्बंध जसे कमी होतील, तशी चीनची व्यापारी संधी विनासायास वाढणार कारण भौगोलिक आणि आर्थिकदृष्ट्या उ. कोरियाला तोच देश निकट आहे.

वरील परिषदांचे एकूण चित्र पहाता, युरोप व अमेरिका या अस्ताकडे जाणाऱ्या जागतिक शक्ती दिसतात, तर चीन ही उगवती महासत्ता.

*wwww.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*